संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ११८/२०२१

निशाणी क्रमांक २४/क

**सरकार तर्फे साक्षीदार क्रं. ४ यांची जबानी**

माझे नांव – निखिल जगन्नाथ पाटील

व.वर्षे – ३५, धंदा – व्यवसाय

रा. शिरोली पुलाची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

**सरतपास सरकारी वकील तर्फे सौ. डी. ए. धुमाळे यांचेतर्फे**

**०१.** मी शिरोली या ठिकाणी व्ही. पी. इंडस्ट्रीज येथे व्यवसाय करत आहे. माझ्या कामाचे स्वरुप फिरतीचे आहे. सन २०२० मध्ये मी त्या ठिकाणीच काम करीत होतो. दिनांक ०८/१२/२०२० रोजी मी वडगांव या ठिकाणी ऑफिसच्या कामासाठी स्प्लेंडर गाडी घेवुन आलो होतो. माझ्यासोबत स्वरुप सुखदेव परीट हे होते. वडगांव ते शिरोली आम्ही परत येत होतो. पुणे बेंगलोर हायवेला आम्ही एक ट्रक पास केला. त्यावेळी पाठीमागुन आवाज आला म्हणून आम्ही पाहीले असता, ट्रकने टु व्हीलरला धडक दिल्याचे दिसून आले. सदरचा अपघात दुपारी १२ ते १२.३० च्या दरम्यान झाला. अपघात झाल्यानंतर धडक दिल्याने महिला टु व्हीलरच्या उजव्या बाजुला ट्रकच्या पाठीमागच्या चाकाखाली आली आणि एक वयस्कर व्यक्ती आणि लहान मुलगी टु व्हीलरच्या डाव्या बाजुला पडले. ट्रक थोडा पुढे गेला होता, पण ट्रकचालक त्या ठिकाणी थांबलेला होता. धडक दिल्याने महिला त्याच ठिकाणी मयत झालेली होती. रस्त्यावर आणि ट्रकच्या चाकाला रक्त आणि मांसाचे तुकडे लागलेले होते. गर्दी झालेली होती. अॅम्ब्युलन्स बोलावल्यानंतर लहान मुलगी आणि वयस्कर व्यक्ती यांना अॅम्ब्युलन्सने सी.पी.आर. ला पाठविले आणि दुस–या अॅम्ब्युलन्सने मयत महिलेस सी.पी.आर. ला पाठवले. अपघातातील ट्रक पाहील्यास मी ओळखु शकतो. ट्रकचा नंबर एम.एच. ०९ सी.ए. ९६१७ असा होता. ट्रकचालकाचे आडनाव फकीर असे होते. त्यांचे पुर्ण नाव मला आता सांगता येत नाही. ज्यांच्यामुळे अपघात घडला त्यांना पाहील्यास मी ओळखु शकतो. आजरोजी मे. न्यायालयात ते हजर आहेत.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे अॅड. एम. एस. पाटील यांचे तर्फे उलटतपास**

**०२.** दिनांक ०८/१२/२०२० रोजी मी फॅक्टरीतुन पेठवडगांवला निघालो होतो. घटना घडली त्यावेळी मी ११.०० वाजता फॅक्टरीतुन बाहेर पडलो होतो. पेठवडगांवला मी साधारणतः

११.३० वाजता पोहोचलो. मी १२.३० ते १२.४५ च्या दरम्यान टोप कासारवाडी फाट्यावर ऑर्डर घेवून पोहोचलो. त्या दिवशी टु व्हीलर मी स्वतः चालवत होतो. हे म्हणणे खरे आहे की, टोप हद्दीत पोहोचल्यानंतर आम्ही ट्रकला पास करुन पुढे गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी रस्त्याला डीव्हायडर नव्हता, रस्त्याच्या दुतर्फा रहिवासी वस्ती होती. हे म्हणणे खरे आहे की, रहदारी असल्याने त्या ठिकाणी वाहनांचा वेग कमी असतो. माझ्या आणि ट्रकमधील अंतर १० फुट असे होते. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी आम्ही ट्रकला पास करुन पुढे गेलो त्यावेळी आम्ही टु व्हीलरला देखील पास करुन पुढे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, टु व्हीलर चालक हे वयस्कर होते आणि महिला शारीरिकदृष्टया जाड होत्या त्यामुळे त्यांची टु व्हीलर ट्रकला धडकली. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ट्रकला पास करुन पुढे गेलो होतो त्यामुळे प्रत्यक्ष अपघात कसा घडला हे मी पाहीले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पुढे गाडी चालवित असल्याने मला अपघातामध्ये कोणाची चुक आहे हे मला माहिती नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगत आहेत की, ट्रकचालकाची चुक आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताचा आवाज ऐकल्यानंतर मी माझी गाडी थांबवली आणि अपघाताच्या ठिकाणी गेलो. हे म्हणणे खरे आहे की, टु व्हीलर चालकाची स्वतःची गाडी नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, टु व्हीलर चालक पडले. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ट्रकला पास करुन गेल्यामुळे पाठीमागे काय घडले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरुध्द मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

जबाब माझ्या समक्ष नोंदविला

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/-

(श्रीमती एस. जे. पेंडे)

दि.२४/०३/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठवडगांव